**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.**

Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक उशिसं/२०१५/प्र.क्र.१६२/१५/बी.एड /८५६५ दिनांक ३१.०८.२०१५

प्रति,

सर्व प्राचार्य,
अध्यापक महाविद्यालये व
शारिरीक शिक्षण महाविद्यालये

**विषय : National Council for Teacher Education (Recognition, Norms & Procedure) Regulations 2014 अन्वये सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ :** शासन परिपत्रक क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२, दिनांक २१.०८.२०१५

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक कृपया पहावे. सुलभ संदर्भासाठी परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. त्याअन्वये त्यांनी ज्या अध्यापक / शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना एनसीटीईकडून सन २०१५-१६ करीता सुधारीत मान्यता देण्यांत आलेल्या आहेत, त्या सर्व महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने National Council for Teacher Education (Recognition, Norms & Procedure) Regulations 2014 अन्वये सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विद्यापीठांकडे विहित वेळेत अर्ज सादर करावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४ अन्वये सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २१ ऑगस्ट, २०१५.

वाचा :-

**राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र.एफ-५१-१/२०१४-एनसीटीई(एन ॲन्ड एस), दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४.**

**शासन परिपत्रक :-**

राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांनी अधिसूचना क्र.एफ-५१-१/२०१४-एनसीटीई(एन ॲन्ड एस), दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ अन्वये National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४ हे सुधारीत नियम प्रसिध्द केलेले आहेत. सदर सुधारीत नियमातील निकषांनुसार सन २०१५-१६ पासून बी.एड/एम.एड/बी.पी.एड/एम.पी.एड अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून, अभ्यासक्रमांचा कालावधी वाढवून तो एक वर्षाऐवजी दोन वर्षांचा करण्यात आलेला आहे. तसेच गुणवत्ता सुधारणेच्या दृष्टीने विद्यार्थी प्रवेश क्षमता १०० वरुन ५० प्रति युनिट केलेली आहे. राज्यातील अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना त्यांनी एनसीटीईकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांच्या आधारे सन २०१५-१६ या वर्षीपासून काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सुधारीत मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार ज्या अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना एनसीटीईकडून सन २०१५-१६ करिता सुधारीत मान्यता देण्यात आलेल्या आहेत, त्या सर्व महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे:-

(१) National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४ अन्वये राज्यातील सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विद्यापीठांकडे अर्ज सादर करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

(२) National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४ अन्वये सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यासाठी संबंधित विद्यापीठांचे कुलगुरु विद्यापीठ स्तरावर आवश्यक तेवढया तज्ञ समिती गठीत करतील.

(३) सदर तज्ञ समितीने संबंधित विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ यांच्याकडून सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयांची सुधारीत आवश्यक निकषांनुसार तपासणी करुन एकत्रित अहवाल विद्यापीठाच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळास सादर करावा. विद्यापीठाच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर संबंधित विद्यापीठाने माहे सप्टेंबर अखेरपर्यंत अशा सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शारिरीक शिक्षण महाविद्यालयास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे किंवा कसे याबाबतची एकत्रित शिफारस शासनास सादर करावी.

(४) संबंधित विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या शिफारसींनुसार राज्यातील सुधारीत मान्यता प्राप्त अध्यापक/शरिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२४१२३८२८११०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**उर्मिला जोशी**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

(१) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
(२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
(४) विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ,
(५) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
(६) उप सचिव (मशि) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
(७) निवडनस्ती (मशि-२).